लक्ष्मण मुरलीधर बाबर व इतर -- वादी
विरुध्द
संजय भारत बाबर व इतर -- प्रतिवादी

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम XXXIX नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त मनाईच्या आदेशासाठी केला आहे. यात वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः-

२. डि.सोलापूर सब.डि व ता. सांगोला पैकी मौजे आलेगाव येथील बागायत जमिन मिळकत गट नं.७३, क्षेत्र ३हे.-१७आर. त्यासी चतुःसिमा पूर्वेस- गट नं.७६/१, ७६/२, दक्षिणेस- आलेगाव बाबरवाडी रस्ता, पश्चिमेस- गाडी रस्ता, उत्तरेस- गट नं.७७/१. येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन आतील दगड, माती, झाड, झुडूप वगैरे तदंगभुत वस्तु व विहीर बागायत पिके इत्यादी हक्कासह. (सदर गट नंबर यास येथून पुढे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येईल.)

३. वादीचे म्हणणे असे की, दावा कलम १ मधील मिळकत वादी यांची वडिलार्जीत मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकत असून त्यामध्ये प्रतिवादी यांचा कधीही कसलाही हक्क अथवा हितसंबंध नव्हता व नाही. दावा कलम १ मधील मिळकतीचे पूर्वेस प्रतिवादींची गट नं.७६/१, ७६/२ या मिळकती आहेत.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी तहसिलदार सांगोला यांचेकडे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम कलम १४३ प्रमाणे रस्ता केस नं.७३ व गट नं.७७/१ चे दरम्यानचे हद्दीवरुन पुर्व-पश्चिम चालीत प्रतिवादीची जमीन गट नं.७६/१ व ७६/२ यामध्ये जाणे येणेसाठी म्हणून रस्ता मिळावा म्हणून

अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचा निकाल दि.०१/१०/२०२१ रोजी होवून तहसिलदार सांगोला यांनी प्रतिवादींना गट नं.७६/१ व ७६/२ मध्ये जाणे येणेसाठी गट नं.७३ व ७७/१ चे दरम्यानचे हद्दीवरुन पुर्व-पश्चिम चालीत रस्ता मंजूर केला आहे.

५. वास्तविक पाहता प्रतिवादी यांना त्यांची जमीन गट नं.७६/१ व ७६/२ मध्ये जाणे येणेसाठी वादी यांनी सदर रस्ता केसमध्ये दाखल केलेले म्हणणेमध्ये अन्य पर्यायी रस्ता उपलब्ध असताना सुध्दा केवळ वादीचे नुकसान करणेचे हेतुने व प्रतिवादींनी राजकीय वजन वापरून व महसुल अधिकारी यांचेशी संगनमत करुन वादीचे दावा मिळकतीमधून बेकायदेशीरपणे नव्याने रस्ता मंजूर करुन घेतलेला आहे. वादींचे दावा मिळकतीमधून प्रतिवादी यांना मंजूर केलेल्या रस्त्यावर कमी-जास्त उंचीचा बांध असून सदरचे बांध हे साडेचार ते पाच फुटाचे आहेत. तसेच सदर बांधावर दोन जंगली झाडे, दोन बोरीचे झाडे, एक चंदनाचे झाड, तीन कडू लिंबाची झाडे व काटेरी झुडपे असलेचे तहसिलदार यांचे पंचनामेवेळी स्पष्टपणे दिसून आलेले आहे व त्याचा उल्लेख ही त्या पंचनामेमध्ये आहे. तसेच वादींचे दावा मिळकतीमधून यापुर्वीही रस्ते गेलेले आहेत. तसेच प्रतिवादी यांना पुर्वेकडून डांबरी रस्त्याला मिळणारा रस्ता आहे व सदरची बाब तहसिलदार यांचे पंचनामेत व निकालपत्रात स्पष्टपणे नमुद असताना देखील सदर पर्यायी रस्त्याचा तहसिलदार सांगोला यांनी कोणताही विचार न करता बेकायदेशीरपणे प्रतिवादी यांचा रस्ता मागणीचा अर्ज मंजूर केलेला आहे.

६. मा. तहसिलदार सांगोला यांनी त्यांचे निकालपत्रामध्ये वादी यांनी दाखल केलेल्या म्हणणे व त्यामध्ये नमुद प्रतिवादी यांना उपलब्ध असणा-या पर्यायी रस्त्याबद्दलचे कसलेही स्पष्टीकरण न देता केवळ प्रतिवादीसच रस्ता मंजूर करणेचे ठरवून वादी यांनी त्यांचे म्हणणेमध्ये नमुद केलेल्या हरकती व पर्यायी रस्ता याबद्दल कोणताही मुद्दा न काढता अथवा प्रतिवादी यांना रस्ता मंजूर करण्याचे एकमेव उद्देशाने प्रतिवादी यांचा अर्ज बेकायदेशीररित्या मंजूर केलेला आहे.

७. मा. तहसिलदार सांगोला यांचे दि.०१/१०/२०२१ रोजीचे निर्णयानुसार प्रतिवादी हे बेकायदेशीररित्या वादींचेच दावा मिळकतीमधून नव्याने रस्ता तयार करणेचा प्रयत्न करू लागलेले आहेत व वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळे निर्माण करु लागलेले आहेत. त्यामुळे वादींचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळे निर्माण होवून वादींचे कधीही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होवून लागले आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी विरूध्द तहसिलदार सांगोला यांनी क्रमांक/जमा-२/रस्ता/एसआर/०२/२०१९ चे कामी दि.०१/१०/२०२१ रोजी दिलेला निर्णय रद्दबालत आहे असे जाहीर होवून मिळणेसाठी व वादींचे दावा कलम १ मधील मिळकतीमधून सदर निर्णयाचे आधारे कलम १ मधील मिळकतीमधून सदर निर्णयाचे आधारे कसलाही रस्ता नव्याने तयार करू नये व वादींचे दावा कलम १ मधील मिळकतीमधील शांततापूर्ण कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींना मिळावी अशी विनंती वादींतर्फे करण्यात आली.

८. सदरचे अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी २३ कडे त्यांचे म्हणणे मांडून अर्जातील मजकूर अमान्य केले. प्रतिवादीचे कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ व २ एकमेकांचे चुलत भाऊ असून मुळ गट नंबर ७६ ही मुळची प्रतिवादी यांचे वडिलार्जीत मालकी वहिवाटीतील आहे. गट नं.७६ या जमीनीचे दक्षिण-पश्चिम कोप-यात गट नं.७६ ही वादी यांची वडिलार्जीत जमीन आहे. गट नं.७३ चे लगत पश्चिमेस गट नं.५२ असून गट नं.५२ यातील हिस्सेक-यांना जाणे-येणेसाठी गट नं.५२ व ७३ चे दरम्यानचे हद्दीवरून पुर्व पश्चिम रस्ता असून तो रस्ता दक्षिणेस मुख्य आलेगाव-बाबरवाडी डांबरी रस्त्यास मिळतो.

९. गट नं.७३ चे उत्तरेस गट नं.७७/१ ही मा.तहसिलदार सांगोला यांचेकडील मुळ रस्ता केस नंबर २/२०१८ मधील सामनेवाला नं.१ ते ३ यांची जमीन असून त्यास लगत पुर्वेस गट नं.७६/१ व ७६/२ या प्रतिवादी यांच्याजमिनी आहेत. गट नं.७६/१ व ७६/२ या जमीनीत प्रतिवादी हे गट नं.७३ व ७७/१ या जमिनी दरम्यानचे बांधावरुन जात येत होते. परंतु दरम्यानचे काळात दि.१०/०८/२०१८ रोजी पासून यातील वादी व इतर यांनी जाणे येणेस प्रतिवादी

यांना सदर ठिकाणी हरकत घेतली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांचे जमिनीत जाणे येणे अशक्य झाले व प्रतिवादी यांचे जमिनीत ज्वारी, हरभरा अशी बागायत पिके असून पिकाची जोपासना करून शेती मालाची वाहतुक पायी अगर वाहनाने करणे, खते, बि-बियाणे घेवून जाणे अशक्य होवू लागले. त्यामुळे कधीही न भरुन येणारे नुकसान होऊ लागले व होत आहे. तसेच गट नं.७५ यातील विहिरीकडे येणे जाणेसाठी असलेल्या रस्त्यावरही वादी हरकती करू लागले. त्यामुळे प्रतिवादी यांची दारकोंडी झाली. त्यामुळे यातील प्रतिवादी यांनी मा. तहसिलदार सो. सांगोला यांचेकडे रस्ता केस नंबर २/२०१८ ही दाखल केली. सदर रस्ता केसचे कामी वर नमूद वादी व तानाजी बाळासो बाबर, सुमन जालिंदर बाबर, नवनाथ जालिंदर बाबर यांचेविरुध्द महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १४३ प्रमाणे रस्ता मागणीचा अर्ज दाखल केला. सदरहु अर्जाचे कामी मा. तहसिलदार सो सांगोला यांनी या दाव्यातील वादी व इतर यांना रितसर नोटीसा काढल्या व त्यांना म्हणणे देणेसाठी योग्य ती संधी देणेत आली. त्याप्रमाणे यातील वादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सदर रस्ता केसचे कामी दिले. त्यानंतर मा. तहसिलदार सांगोला यांनी सदरचे प्रकरण स्थळपाहणीसाठी ठेवले व यातील वादी व प्रतिवादी व इतर यांना रितसर नोटीसा देवून दि.११/०८/२०२१ रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली व तसा पंचनामा देखील केला व त्याप्रमाणे मा. तहसिलदार सांगोला यांनी वरील सर्व गोष्टींचा विचार करून सदर रस्ता केस गुणावगुणावर चालवून तारीख दि.०१/१०/२०२१ रोजी सर्व कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब कून योग्य व बरोबर दिलेला आहे. सदरचे कायदेशीररित्या दिलेल्या निकालामुळे यातील वादी यांचे हक्कावर कोणत्याही प्रकारे अन्याय झालेला नाही.

१०. प्रतिवादींचे पुढे असे कथन की, प्रतिवादी यांना आलेगाव-बाबरवाडी हा मुख्य डांबरी रस्त्यापासून गट नंबर ५२ व ७३ या जमिनी दरम्यानचे हद्दीवरून असलेल्या रस्त्यावरून पुढे गट नं.७३ व ७७/१ या जमीनी दरम्यानचे हद्दीवरून गट नं.७६/१ व ७६/२ या जमिनीत जाणे येणेसाठी गाडी रस्त्याचे व्यतिरीक्त अन्य कोणताही रस्ता सदर ठिकाणी नाही. तहसिलदार सांगोला यांचेकडील रस्ता केस नंबर २/२०१८ चे अवलोकन केले असता सदर दाव्याचे व तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे

कामी आवश्यक पक्षकाराची बाधा येत असलेमुळे सदरचा दावा व ताकीद अर्ज कायद्याने चालु शकत नाही.

११. प्रतिवादींचे पुढे असे कथन की, वादी यांना प्रथमदर्शनी केस मुळीच नसून न्यायाचा समतोल हा पुर्णपणे प्रतिवादी यांचे बाजुने आहे. यातील वादी यांचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांना त्यांचे जमिनीत जाणे येणे अशक्य होवून प्रतिवादी यांचे बागायत पिकाची जोपासना करून शेती मालाची वाहतुक पायी अगर वाहनाने करणे, खते, बि-बियाणे घेवून जाणे अशक्य होणार आहे व प्रतिवादी यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होवून प्रतिवादी यांचे नैसर्गिक न्याय हक्कावर अन्याय होणार आहे. याउलट वादी यांचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर केलेस वादी यांचे कोणत्याही प्रकारचे व कसल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

१२. वादी, प्रतिवादींच्या कथनावरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजूने आहे काय? | होय |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | होय |
| ३. | सदरचा अर्ज नामंजूर केल्याने वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | होय |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>कारणमिमांसा</u>

१३. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, वादींनी आपल्या कथनापृष्टयर्थ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १. | मौजे आलेगाव, ता. सांगोला येथील गट नं.७३, ७६/१, ७६/२ चा ७/१२ उतारा | ४/१ ते ४/३ |

| | | |
|---|---|---|
| २. | मा. तहसिलदार सांगोला यांनी क्रमांक/जमा-२/ रस्ता/एसआर/०२/२०१९ मध्ये दिनांक ०१/१०/२०२१ रोजी दिलेले निकालपत्र. | ४/४ |
| ३. | प्रतिवादी यांनी मा. तहसिलदार सांगोला यांचेकडे दाखल केलेले अर्जाची सहीशिक्याची नक्कल | ४/५ |
| ४. | वादी यांनी प्रतिवादी यांचे अर्जास दिलेले म्हणणेची सहीशिक्याची प्रत | ४/६ |
| ५. | तहसिलदार सांगोला यांचेकडील पंचनाम्याची सहीशिक्याची नक्कल | ४/७ |

१४. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, प्रतिवादींनी आपल्या कथनापृष्टयर्थ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १. | कच्चा हात नकाशा | २६/१ |
| २. | रस्ता केस ७/२०१७ मध्ये नोटीस बजावलेची प्रत, निकाल | २६/२, २६/३ |

<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत-</u>

(सदर मुद्यांचे निष्कर्ष एकमेकांवर अवलंबून असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रात विचारात घेतले आहेत.)

१५. सदरच्या अर्जावर वादीतर्फे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी जमिन महसूल अधिनियम कलम १४३ अन्वये मा. तसलिदार यांच्याकडे नवीन रस्ता मागणीसाठी अर्ज केलेला होता. सदर अर्जावरील आदेशाने प्रतिवादींना वादीच्या मिळकतीमधून नवीन रस्ता दिला आहे. तहसिलदार यांच्याकडे केलेल्या पंचनामामध्ये प्रतिवादींना वादी कथन करत असल्याप्रमाणे पर्यायी रस्ता असल्याचे दिसून आले आहे. तरी देखील बेकायदेशीरपणे वादीच्या मिळकतीतून नव्याने रस्ता देण्याचा आदेश केलेला आहे. कलम १४३ अन्वये शेतक-याला त्याच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी रस्ता नसल्यास व त्या शेतक-याला शेतीमध्ये जाण्यासाठी रस्ता आवश्यक असल्यास

आदेश केला जाऊ शकतो. प्रतिवादींना त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी रस्ता नसताना अर्ज मंजूर करणे योग्य होते. प्रतिवादींनी दाव्यासोबतचा नकाशा नाकारलेला नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादींना तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास मा. तहसिलदार यांच्या बेकायदेशीर आदेशावरुन वादीच्या मिळकतीमधून रस्ता करण्याची दाट शक्यता आहे. वादीस प्रथमदर्शनी केस आहे. दाव्याचा समतोल वादीच्या बाजूने आहे. अर्ज मंजूर न केल्यास वादीचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरुन येणार नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

१६. याउलट प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, मा. तहसिलदार यांच्याकडील अर्जामध्ये सर्वांना नोटीसा काढून म्हणणे देण्याची संधी दिली आहे. रस्ता केस नं.७/२०१७ मध्ये वादीने म्हणणे दिले नाही. तहसिलदार यांच्याकडील पंचनामावर वादी व प्रतिवादींची सही आहे. मा. तहसिलदार यांनी नव्याने दिलेला रस्ता जास्तीत जास्त शंभर फुट लांबीचा आहे. तहसिलदार यांच्या निकालावर वादीने अपील केले नाही. वादीस प्रथमदर्शनी केस नाही. दाव्याचा समतोल वादीच्या बाजूने नाही. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

१७. वादीच्या व प्रतिवादीच्या कथनावरुन अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन वादीस प्रथमर्दशनी दावा मिळकतीमध्ये हक्क दिसून येतो का? हे पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादीच्या गट नं.७६/१ च ७६/२ मध्ये जाणे येणेसाठी गट नं.७३ व ७७/१ च्या दरम्यानचे हद्दीवरुन पूर्व-पश्चिम चालीचा रस्ता मंजूर केला आहे. परंतु प्रतिवादींना त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी पर्यायी रस्ता गट नं.७१ च्या व गट नं.७६/१, ७६/२ चा पूर्व बाजूने अस्तित्वात आहे. वादीने दाव्यातील कथनापृष्ठ्यर्थ दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे स्पष्टपणे दिसून येते की, दोन्ही पक्षकारांमध्ये मिळकतीच्या मालकी हक्काबांबत वाद दिसून येत नाही. पूर्वी तानाजी बाळासाो बाबर यांनी रस्ता केस क्र.७/२०१७ दाखल केलेवरुन तहसिलदार यांनी गट नं.७३ या वादीच्या मिळकतीच्या व गट नं.५२ या तानाजी बाबर यांच्या मिळकतीच्या दरम्यान

रस्त्यावर हरकत अडथळा करु नये अशी ताकीद दिलेली आहे. रस्ता केस क्र.२/२०१९ महाराष्ट्र जमिन महसूल अधिनीयम १९६६ चे कलम १४३ अन्वये केलेल्या अर्जावरून तहसलिदार यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यातील अर्जदार यांना पूर्वेकडून डांबरीला मिळणारा रस्ता आहे परंतु अर्जदार यांनी 'पाऊस पाणी रस्ते व त्याचा माझ्या शेतात वापर होत नसून पलीकडच्या शेतक-यास होत आहे' असे पंचनामावरुन नमूद केलेले आहे. यावरुन प्रतिवादींना पर्यायी व सोयीचा रस्ता आहे हे स्पष्टपणे दिसून येते. तसेच पंचनामाचे अवलोकन केले असता सदर केस मधील अर्जदारांनी मागणी केलेल्या सर्वे नंबरचा बांध कमी जास्त उंचीचा चार ते पाच फुट उंचीचा दिसून आला. सदर बांधावर जंगली झाडे, गोरीची झाडे, चंदनाचे झाड, कडूलिंब असल्याचे दिसून आले असे नमूद आहे. प्रतिवादींनी त्यांच्या मिळकतीच्या पूर्व बाजूस पंचनामामध्ये नमूद केलेल्या रस्त्याबाबत काहीही कथन केले नाही. तसेच हातनकाशामध्ये सदर रस्ता दर्शवलेला दिसून येत नाही. परंतु त्यावरुन तहसिलदार यांचेकडी पंचनामा मध्ये नमूद केलेली परिस्थिती नाकारता येणार नाही. ही सर्व परिस्थिती पाहता प्रतिवादींना पर्यायी रस्ता उपलब्ध असताना देखील नवीनपणे रस्ता देण्याची आवश्यकता, तसेच प्रतिवादींची दारकोंडी झाली असल्याची परिस्थिती दिसून येत नाही. तहसिलदार यांच्याकडील पंचनामावरुन प्रतिवादी कथन करत असल्याप्रमाणे गट नं.७३ व ७७/१ या जमिनीदरम्यानचे बांधावरुन प्रतिवदी ये-जा करत होते किंवा त्या ठिकाणी रस्त्याचे अस्तित्व आहे असे दिसून येत नाही. प्रतिवादींनी त्यांच्या मिळकतीच्या पूर्व बाजूस असलेल्या रस्त्याविषयी कथन केलेले नाही. सदरची परिस्थिती स्पष्टपणे मांडली नाही.

१८. वादीस प्रथमदर्शनी केस दिसून येते. दाव्याचा समतोल वादीच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत अर्ज नामंजूर केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे अपरिमीत नुकसान होणार आहे. वादी व प्रतिवादी यांचे कथन पुराव्याअंती सिध्द होणार आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीचे बाजूने दिसून येत असताना अर्ज नामंजूर केल्यास वादीचा दावा मिळकतीमधील हक्क डावलला जाणार आहे. याउलट अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. दावा गुण-

दोषावर निकाली होताना वादी व प्रतिवादी याचे हक्क स्पष्ट होणार आहेत. या सर्व कारणास्तव, मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक ४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

आ दे श

१. अर्ज (नि.५) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींना तुर्तातूर्त ताकीद देणेत येते की, दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्यांनी क्र./जमा-२/रस्ता/एस.आर./०२/२०१९ मधील दि.०१.१०.२०२१ रोजीच्या निकालाच्या आधारे दावा मिळकत मौजे आलेगाव येथील गट नं.७३ मधून नव्याने रस्ता करू नये व वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहीवाटीस स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये.

३. अर्ज खर्च अंतिम निकालात समाविष्ट करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2021.12.17 17:43:51 +0530

सांगोला.
दिनांक – १०/१२/२०२१.

(सौ. एस. के. देशमुख)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 17.12.2021 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 17.12.2021 |